**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे**

(आस्थापना शाखा)

पहिला मजला, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, कोर्ट नाका, ठाणे (प) ४०० ६०१.
दुरध्वनी क्र. २५३४३६३६ (विस्तार २११) फॅक्स क्र. २५३४९२०० ईमेल – est.collectorthane@gmail.com

---

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/कावि-५७/२०११ दिनांक : १३/१०/२०१४

विषय :- ठाणे जिल्हयातील अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक १ जानेवारी २०११ रोजीची सुधारित अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत

**ज्ञापन :**

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम ३(क) व ४(१) व शासन महसूल व वनविभागाकडील परिपत्रक क्रमांक एसआरव्ही२०१४/प्र.क्र.२५/ई-७ दिनांक ३१/०१/२०१४ मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/आस्था/कार्या-३/इएनजी/सुधारीत जेष्ठता यादी/२०१४ दि. १०/०९/२०१४ मधील निर्देशानुसार ठाणे जिल्हयातील अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०११ ची सुधारीत अंतरिम जेष्ठता यादी या कार्यालयाच्या समक्रमांकाच्या दिनांक १७/०९/२०१४ ज्ञापनासोबत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरची यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देणेबाबत तसेच सदरची यादी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेबाबत सर्व संबंधित कार्यालय / शाखा प्रमुखांना सुचना देण्यात आलेल्या होत्या. सदर जेष्ठता यादीमध्ये हरकती सुचना असल्यास लेखी स्वरुपात जेष्ठता यादी प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ८ दिवसांत सबळ पुराव्याच्या कागदपत्रासह कार्यालय प्रमुखामार्फत सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तसेच विहीत मुदतीत प्राप्त न झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही अश्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार दोन अ.का. संवर्गातील कर्मचा-यांनी आक्षेप नोंदविलेले असुन त्याबाबत घेतलेला सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेले आहे. ठाणे जिल्हयातील अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०११ ची सुधारीत अंतरिम जेष्ठता यादी या ज्ञापना सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सर्व संबंधित कार्यालय / शाखा प्रमुखांना सुचित करण्यात येते की, ही सुधारित अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द होताच यादीच्या प्रती सबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्यांची त्यावर दिनांकीत पोहोच घेण्यात यावी. तसेच जेष्ठता यादी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यांत यावी. त्याबाबतचा अहवाल आठ दिवसात सादर करावा.

सदरची यादी या कार्यालयाचे www.thane.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

स्वाक्षरी/-
(पी. वेलरासू)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रत :-

१) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर
२) अपर जिल्हाधिकारी ठाणे मुख्यालय जव्हार
३) अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे नागरी संकुलन ठाणे
४) उपविभागीय अधिकारी ....................
५) उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी उल्हासनगर ना. सं. ठाणे
६) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), .......................
७) तहसिलदार .............................
८) अपर तहसिलदार (अकृषिक) ..........................
९) शाखा प्रमुख, ......................................................, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
१०) शाखा प्रमुख, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

२/- या सोबतची यादी या कार्यालयाचे www.thane.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

जिल्हाधिकारी ठाणे करिता